**नमुना दोन**

जा. क्र. जिपही/शिवीप्रा/शा.मा./ 1004 /२०२२.
शिक्षण विभाग (प्रा), जिल्हा परिषद हिंगोली.
दिनांक :- /०७/२०२२.
20-09-2022

प्रति,

प्राचार्य,
स्व. माणिक पोदार लर्न स्कूल,
वाढोणा ता. सेनगाव जि. हिंगोली.,

विषय :- महाराष्ट्र बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालाकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट-नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाण देण्याबाबत...

संदर्भ:-

१. महाराष्ट्र बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८
२. बालाकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट-नियम (४) अन्वये पोट-नियम (४) ३.
३. गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती सेनगाव यांचा तपासणी अहवाल दिनांक :-०४/०४/२०२२.
४. मुख्याध्यापक, स्व. माणिक पोदार लर्न स्कूल, वाढोणा ता. सेनगाव जि. हिंगोली. पत्र क्र. २१२/२०२२. दिनांक :- २१/०४/२०२२

आपल्या स्वयमुंल्याकनाच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यांनतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद हिंगोली . **दिनांक :- ०१/०४/२०२२ पासुन दिनांक :- ३१/०३/२०२५** पर्यत (तिन वर्षांच्या) कालावधीसाठी **इयत्ता ०१ ली ते १२ वी** करिता आपल्या **स्व. माणिक पोदार** लर्न स्कूल, **वाढोणा ता. सेनगाव जि. हिंगोली.** शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या आधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणी इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा सलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थीतीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र ए) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन राहील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी, असे कि, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बांबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या/ तिच्या माता पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्या अभावी, धर्म, जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

(एक) शाळेस प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसीक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेल्या प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेली अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे कि, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची /तीची कर्तव्ये शिक्षा पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकांने /शिक्षीकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वताला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चीती शाळा करिल.

७. शाळा समुचित प्राधिकाराने निर्धारित केलेल्या अभ्यास क्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

८. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

| | | |
|---|---|---|
| • शाळेचा परिसराचे क्षेत्रफळ | -- | 8400 चौ. मी. |
| • एकुण वर्ग खोल्यांचे क्षेत्र | -- | 1901 चौ. मी. |
| • खेळाचे मैदानाचे क्षेत्रफळ | -- | 1271 चौ. मी. |
| • वर्ग खोल्यांची संख्या | -- | 16 |
| • कार्यालय नि भांडार मुख्याध्यापकाची खोली. | -- | होय |
| • मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह-जेथे वापर करावयाचा आहे. प्रसाधन गृहे स्वच्छ आणी आरोग्यदायी स्थितीत ठेव यासाठी पुरेसे पाणी असेल | -- | 10 |
| • पिण्याच्या पाण्याची सुविधा | -- | आहे. |
| • दुपारचे जेवन्न शिजविण्यासाठी स्वयंपाक घर | -- | लागू नाही |
| • अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडा विषय सामुग्री /ग्रंथालय याची उपलब्धता | -- | आहे. |
| • वाचन साहित्य विनासायास उपलब्ध (पुस्तके ) | -- | 500 |

१०. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाही.

११. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१२. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम, १९६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनिमय, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१३. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या वा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१४. शाळेचे लेखे सनदी लेखापाला कडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक पत्र दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी.

१५. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक (युडायस क्र. ) २७१६०२०७३०२ असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१६. शिक्षण संचालक /शिक्षणाणाधीकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सुचनाचे पालन करावे.

१७. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चीती करावी.

**शिक्षणाधिकारी (प्रा),**
जिल्हा परिषद हिंगोली.

**प्रतिलीपी :-**

१. मा. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सेनगाव, यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव..
३. अध्यक्ष/सचिव, अश्वीन शिक्षण ग्रामिण विकास व बहूदेशीय संस्था चिखली यांना माहितीस्तव...

शिक्षणाधिकारी (प्रा),
जिल्हा परिषद हिंगोली.

Principal
Late Manik's Podar
Learn School, Wadhona
Dist. Hingoli, Maharashtra

Manager
Late Manik's Podar
Learn School, Wadhona
Dist. Hingoli, Maharashtra